# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

E-mail :- desk2a@dte.org.in Internet :http/www.dte.org.in

दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२ २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.


(२०१५-डिजीटाईज्ड कालबध्द सेवा वर्ष)

क्रमांक : २अ/एडीएम/रॅगिंग/२०१५/ १८९४

दिनांक : 30 NOV 2015

प्रति,

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/नागपूर/अमरावती

विषय:- शैक्षणिक वर्ष २०१५-१६ साठी अँटी रॅगिंग/अँटी कॅपीटेशन फी /तक्रार निवारण कक्ष स्थापन करण्याबाबत.

संदर्भ : या कार्यालयाचे पत्र क्रमांक २अ/एडीएम/रॅगिंग/२०१५/१७८०, दिनांक : २९/१०/२०१५

उपरोक्त विषया संदर्भाधिन या कार्यालयाचे पत्र कृपया पहावे

पस्तुत प्रकरणी आपणांस कळविण्यात येते की, शासन पत्र क्रमांक संकीर्ण - १०९८/११३/९८) विशी-३, दि. २७ मे १९९९ अन्वये रॅगिंग प्रतिबंध अधिनियम १९९९ दि. ०१ जून १९९९ पासून अंमलात आलेला आहे. सदर अधिनियमाच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, आपल्या विभागातील एमबीए/एमएमएस, एमसीए पदव्युत्तर पदवी तसेच अभियांत्रिकी /तंत्रशास्त्र, वास्तुशास्त्र, औषधनिर्माणशास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट अॅड कॅटरिंग टेक्नॉलॉजी पदवी/ पदविका आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम चालविण्या-या सर्व शासकीय, शासकीय अनुदानित, विद्यापीठ व्यवस्थापित, विद्यापीठ विभाग तसेच विनाअनुदानित संस्थांच्या प्राचार्यांना रॅगिंग प्रतिबंध अधिनियम १९९९ च्या ठळक प्रती संस्थेच्या आवारात, क्लासमध्ये, कॅंटीन आणि वसतीगृह या ठिकाणी विद्यार्थ्यांच्या निदर्शनास येईल अशा पध्दतीने प्रसिध्द करण्याबाबत तसेच प्रथम वर्ष विद्यार्थ्यांची व वरिष्ठ वर्गातील विद्यार्थ्यांच्या वेगवेगळया बैठका आयोजित करुन त्यांना अधिनियमासंबंधी सूचना देण्यात याव्यात. आणि रॅगिंग प्रकरण संस्थेत घडणार नाही, याबाबत दक्षता घेण्यात यावी. जर रॅगिंग प्रकरण घडल्यास संबंधित संस्थेच्या प्राचार्यांना जबाबदार धरण्यात येईल.

रॅगिंग प्रकरण घडू नये म्हणून खालील सूचनांचे पालन करण्याबाबत संस्थाच्या प्राचार्यांना/संचालकांना कळविण्यात यावे.

शिक्षण / प्रोग्राम संकेतस्थळावर प्रसिद्ध करावे
30.11

6600 30/11/15

1. प्राचार्य, उपप्राचार्य, रेक्टर यांची निवासस्थाने कॉलेज व हॉस्टेल कॅम्पसमध्ये असावीत.
2. त्यांनी दररोज आकस्मिक भेटी, विशेषतः हॉस्टेलना रात्रीच्या वेळी भेटी देण्यात याव्यात.
3. संस्थेच्या माहिती पुस्तिकेत याचे स्पष्टीकरण असावे व दरवर्षी प्रत्येक विद्यार्थी व पालकांकडुन संबधित विद्यार्थी रॅगिंगपासून दूर राहिल असे प्रतिज्ञापत्र साध्या पेपरवर भरुन घ्यावे. (शासनाच्या धोरणा नुसार प्रतिज्ञापत्रासाठी स्टँम्प पेपरची आवश्यकता नाही या बाबीची विशेषत्वाने नोंद घ्यावी. )
4. वर्षातून एकदा, संस्थास्तरावर पालकांचे मेळावे वर्षभरात एक दोन वेळा आयोजित करावेत व संस्थेची शिस्त आणि विद्यार्थ्यांचे वर्तन या बाबींची त्यातुन माहिती दयावी.
5. विद्यार्थी परिषदांनी आपल्या कार्यक्रमातून रॅगिंग विरुध्द आवाज उठवावा.

त्याचप्रमाणे आपल्या अधिनस्त व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्थांना अँटी कॅपिटेशन ॲक्टमधील सर्व तरतूदी बंधनकारक असून त्याचे उल्लंघन करणा-या संस्थावर कारवाई करण्यात येईल याची जाणीव करुन देण्यात यावी.

तसेच व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्थामध्ये Womens Redresal Cell (महिला तक्रार निवारण समिती) स्थापन करणे व त्याची माहिती संस्थेच्या माहितीपुस्तिकेत व संस्थेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणे अनिवार्य असल्याची बाब सर्व संस्थांना कळविण्यात यावी.

(डॉ. सुभाष महाजन)
संचालक
तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य, मुंबई.